शबरीमलाची कायदेशीर वाट ...

" आता माझ्या घरात पूजा मी सोवळे नेसून करायची की पॅंट घालून ते पण सर्वोच्च न्यायालय ठरवणार का? कोर्टाला काही कामे नाहीत का? प्रलंबित दावे निकालात काढा म्हणावे आधी .." माझ्या भावाचे तावातावाने चाललेले बोलणे ऐकून मी हॉल मध्ये आले आणि चर्चेत सहभागी झाले. शनि शिंगणापूर नंतर शबरीमला आणि महिलांचा मंदिर प्रवेश न्यायालयात पोचला आणि अनेकांच्या भुवया उंचवल्या गेल्या. मग महिलाना कामे नाहीत का ईथपासून न्यायालयांना हिंदू सण, रीतीरिवाजच दिसतात का? ईथपर्यंत चर्चांना उत आला.

न्यायालयांची पुरोगामी भूमिका आणि सध्या येणारे अनेक प्रगतिशील निर्णय यांचे स्वागत आणि त्यावर साकल्याने आणि तटस्थपणे विचार होण्याची गरज आहे. मुळात न्यायालयाने अनेक धर्मातील प्रथा, मंदिर-दर्गा येथील महिलांचा प्रवेश याबाबत दिलेले निर्णय हे स्वत:हून दाखल केलेल्या (स्यू-मोटो) दाव्यातील नसून कुणा व्यक्तीने वा संस्थेने तिच्या वा समाजाच्या एका घटकाच्या मूलभूत हक्कांची पायमल्ली झाल्यामुळे दाखल झालेल्या दाव्यातील आहेत. त्यामुळे न्यायालये हिंदूंच्या धार्मिक बाबतीत ढवळाढवळ करत आहेत हा आक्षेप चुकीचा आहे. भारतीय राज्य घटनेने प्रत्येक भारतीय नागरिकाला काही महत्वाचे मूलभूत अधिकार दिलेले आहेत. त्यात समानतेचा अधिकार (कलम १४), धर्म, वंश, जात, लिंग, जन्माचे ठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव भेदभावाची वागणूक न देण्याचा अधिकार (कलम १५), तसेच कोणत्याही धर्माचा अंगीकार करण्याचा व स्वत:च्या धर्माचे पालन व प्रचार करण्याचा अधिकार (कलम २५ व २६) ह्यांचा समावेश होतो. शबरीमला येथील मंदिरात १० ते ५० वर्षे वयोगटातील महिलाना घालण्यात आलेली प्रवेश बंदी ही केरळ सरकारच्या "हिंदू सार्वजनिक पूजा स्थळे (अधिकृतता आणि प्रवेश) अधिनियम १९६५ च्या नियम ३ (ब) नुसार घालण्यात आलेली आहे. ह्या नियमाच्या वैधतेला व त्या नियमांनुसार १० ते ५० वयोगटातील महिलांच्या मंदिर प्रवेशाला घालण्यात आलेल्या बंदीला 'इंडियन यंग लॉयर्स असोसिएशन व ईतर यांनी मूलभूत हक्कभंगाच्या कारणावरून आव्हान दिले. केरळ उच्च न्यायालयाने केरळ सरकारच्या "हिंदू सार्वजनिक पूजा स्थळे (अधिकृतता आणि प्रवेश) अधिनियम १९६५

चा नियम ३ (ब) वैध ठरवून १० ते ५० वयोगटातील महिलांच्या मंदिर प्रवेशाला असलेली बंदी योग्य ठरवली. त्या निर्णयाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान देण्यात आले. सर्वोच्च न्यायालयाच्या पाच जणांच्या खंडपीठाने केरळ सरकारच्या "हिंदू सार्वजनिक पूजा स्थळे (अधिकृतता आणि प्रवेश) अधिनियम १९६५ चा नियम ३ (ब) हा शक्ति बाह्य (ultra vires) व अवैध आणि १० ते ५० वयोगटातील महिलांच्या मंदिर प्रवेशाला असलेली बंदीही अवैध ठरवली, ज्यावरून सध्या प्रचंड वादळ उठले असून त्या निर्णयाविरोधात १८-१९ पुनर्विचार याचिकाही दाखल झालेल्या आहेत.

मुळात ज्या केरळ सरकारच्या "हिंदू सार्वजनिक पूजा स्थळे (अधिकृतता आणि प्रवेश) अधिनियम १९६५ च्या नियम ३ (ब) नुसार ही १० ते ५० वयोगटातील महिलांच्या मंदिर प्रवेशाला असलेली बंदी घालण्यात आली आहे त्यातील काही तरतुदी कळणे गरजेचे आहे. केरळ सरकारच्या "हिंदू सार्वजनिक पूजा स्थळे (अधिकृतता आणि प्रवेश) अधिनियम १९६५ च्या कलम ३ नुसार सार्वजनिक पूजेची ठिकाणे सर्व वर्गाच्या हिंदूंना खुली ठेवण्याची स्पष्ट तरतूद असून कोणत्याही वर्गाच्या, भागाच्या हिंदूला तिथे जाण्यापासून रोखण्याची, थांबवण्याची, पूजा करण्यापासून रोखण्याची किंवा धार्मिक सेवा करण्यापासून रोखण्याची मुभा नसल्याचे स्पष्ट करते. ह्याच कायद्याच्या कलम ४ (१) नुसार संबंधित न्यासाच्या विश्वस्ताना किंवा सक्षम प्राधिकाऱ्याला सुव्यवस्था राखण्यासाठी, देवस्थानाची सभ्यता राखण्यासाठी तसेच सार्वजनिक पूजा स्थानावर योग्य ती धार्मिक कृत्ये करण्यासाठी कोणतेही नियम करण्याचे अधिकार देण्यात आलेले आहेत. त्याच कलमाच्या अटींनुसार (Proviso) **कलम ४ (१) मध्ये दिलेले अधिकार वापरताना कोणत्याही हिंदू व्यक्तीच्या विरोधात कोणत्याही प्रकारचा भेदभाव तो हिंदू विशिष्ट वर्गाचा असल्यावरून करता येणार नाही असे विशेषत्वाने नमूद केलेले आहे.** असे असताना त्याच कायद्याच्या नियम ३ नुसार त्यात नमूद केलेल्या काही ठराविक वर्गाच्या लोकांना कोणत्याही सार्वजनिक पूजेच्या जागेवर पूजा करण्यापासून, पवित्र ठिकाणी आंघोळ करण्यापासून वा विहीर, झरा मग तो त्या सार्वजनिक पूजा स्थळाबाहेर, एखाद्या डोंगरावर वा ईतर ठिकाणी असेल तेथील पाणी वापरण्यापासून, तसेच एखादा रस्ता, मार्ग जो सार्वजनिक पूजा

स्थळाकडे जातो तो वापरण्यापासून बंदी घालण्याची तरतूद करण्यात आली आहे व त्यातील ३ (ब) नुसार "स्त्रिया ज्या अश्या वेळी जेव्हा रीतिरिवाज व पद्धतिनुसार सार्वजनिक पूजा स्थानी प्रवेश करू शकत नाहीत" त्यांनाही मंदिर प्रवेशास बंदी घालण्याची तरतूद केली गेली. नियम ३ (ब) हा कलम ३ मधील तरतुदी व कलम ४ च्या अटींशी पूर्ण विसंगत असून परस्पर विरोधी आहेत कारण एक तरतूद समानता देते तर दुसरी तरतूद भेदभाव करते. त्यामुळेच ह्या नियम ३ (ब) च्या वैधतेला न्यायालयात आव्हान देण्यात आले व सर्वोच्च न्यायालयाने नियम ३ (ब) घटनविरोधी व अवैध असल्याचे स्पष्ट केले आहे. हा नियम भारतीय राज्यघटनेच्या कलम १४ च्या समानतेच्या विरोधात तर आहेच पण आपण जो आंतरराष्ट्रीय करार (International Convention on Elimination of All forms of Discrimination against Women CEDAW) केला आहे त्याच्या विरोधातही आहे कारण त्या करारानुसार स्त्रियांच्या विरोधात असणारा सर्व प्रकारचा भेदभाव नष्ट करण्यास आपण कटिबद्ध आहोत आणि त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय CEDAW कराराशी देखील सुसंगतच आहे. तसेच हा निर्णय न्यायालयाने त्यांच्या कायद्याची वैधता ठरवणे ह्या अधिकारातच घेतला असून आपण समजतो तसे धार्मिक बाबतीत ढवळाढवळ करण्यासाठी नाही॰

अजून एक महत्वाचा मुद्दा न्यायालयाने अधोरेखित केला आहे तो म्हणजे कलम २५ व २६ नुसार कोणत्याही धर्माचे पालन करण्याचा, त्याचा प्रचार करण्याचा व धर्माच्या बाबतीत स्वत:च्या धर्माच्या रीतीरिवाजांचे पालन करण्याचा प्रत्येक भारतीय नागरिकाला मूलभूत अधिकार असला तरी त्या आधारे त्याच धर्माच्या लोकांमध्ये भेदभाव करण्याचा अधिकार नाही. न्यायालयाने हे देखील स्पष्ट केले आहे की शबरीमला येथे महिलाना प्रवेशबंदी ही कोणत्याही धार्मिक निकषांवर आधारित असल्याचे स्पष्ट होत नाही वा त्याला कोणताही तार्किक आधारही नाही. मुळात केरळ सरकारचा "हिंदू सार्वजनिक पूजा स्थळे (अधिकृतता आणि प्रवेश) अधिनियम" हा १९६५ चा कायदा आहे व शबरीमला येथे ६०-७० वर्षापूर्वी महिलाना मुलांना पहिला भात भरवण्याच्या धार्मिक कारणांसाठी प्रवेश दिला जात असे हे देखील न्यायालयासमोर आलेले आहे.

शनि शिंगणापूर असो वा शबरीमला स्त्रियांना मंदिर प्रवेश नाकारताना त्यामागे पुरुषप्रधान वर्चस्व, स्त्रियांवर विविध मार्गानी ताबा ठेवण्याची, त्यांचे दमन करण्याची वृत्ती ही कारणे असल्याने त्याला तार्किक वा शास्त्रीय आधार नाही. त्यामुळे भावनेचा आधार घेऊन लोकांना भडकावले जाते. महिलांची लढाई ह्याच पुरुषी वर्चस्वाविरूद्ध व न्याय हक्क व त्यांची अंमलबजावणीसाठी आहे कोणत्याही धर्माविरुद्ध नाही. सर्वोच्च न्यायालयाने हाजी अली, शबरीमला अश्या अनेक दाव्यात अनेक प्रगतिशील आणि स्तुत्य निर्णय देऊन स्त्रियांच्या समानतेच्या वाटेवर पाऊले उचलली आहेत. आमच्या धर्मात न्यायालयाचा हस्तक्षेप का ? असे विचारणाऱ्या अनेकांना कायद्याच्या तरतुदींची, स्त्रियांच्या अधिकारांची, प्रत्येक नागरिकांच्या मूलभूत अधिकारांची माहिती नाही आणि म्हणूनच हिंदूंचीच मंदिरे, सण दिसतात का असे प्रश्न उपस्थित होतात. एकदा न्यायालयाने निर्णय दिल्यानंतर पुनर्विचार याचिका दाखल करणे हा एक प्रकारे न्यायालयावर दबाव टाकण्याचाच प्रकार आहे कारण पुनर्विचार याचिका ही नेहमी निर्णय देताना कायद्याच्या तरतुदींचा विचार झाला नसेल, एखादी तरतूद वा कायदेशीर बाजू निर्णय घेताना न्यायालयासमोर आणली नसेल तर त्यावर केली जाते. पण या निर्णयात पाच जणांच्या खंडपीठाने वादी, प्रतिवादी, हस्तक्षेप करणारे, न्यायालयाला मदत करणारे यांचे म्हणणे ऐकून, कायदे, त्यातील तरतुदींचा विचार करून, न्यायालयाने दिलेल्या पूर्वीच्या अनेक निकालांचा विचार करून दिलेला आहे ज्यात खरे तर पुनर्विचाराची आवश्यकता नाही. त्यामुळेच ह्या पुनर्विचार याचिका लोकशाहीतील पक्षीय राजकारण, धार्मिक सत्तेचा दबाव, येत्या निवडणुका आणि त्यासाठी लोकांच्या भावनेचे राजकारण ह्या सर्वांचा परिपाक आहे असे म्हणायला हरकत नाही. मात्र भारतीय न्यायप्रणालीने स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व जपत खंबीर आणि प्रागतिक निर्णय घेण्याची परंपरा राखली असल्याने आताही तसाच प्रगतिशील निर्णय येईल यात शंकाच नाही. अर्थात न्यायालयांच्या निर्णयाच्या अंमलबजावणीची जबाबदारी सरकार ईतकीच समाजाचीही आहे व त्यासाठी समाज प्रबोधनाची गरज आहे हे विसरून चालणार नाही.

एडव्होकेट नयना परदेशी.

निकालाच्या पहिल्या भागात न्यायालयाने हिंदूंच्या दुहेरी वर्तणूकीची चर्चा करताना एकीकडे स्त्रीला देवत्व दिले जाणे तर दुसरीकडे तिलाच मंदिर प्रवेशापासून रोखले जाणे ही मनोवृत्तीच स्त्रियांच्या दुय्यमतेला कारणीभूत असल्याचे नमूद केले आहे. त्यातून न्यायालयाचा पुरोगामी दृष्टीकोन स्पष्ट होतो.

शबरीमलाची लढाई ही पुरुषी वर्चस्वाविरोधातली आणि घटनेने दिलेले अधिकार मिळण्यासाठी केलेली कायदेशीर लढाई आहे व न्यायालयाने कायद्याच्या चौकटीत बसणारे हक्क व त्याची अंमलबजावणी यासाठी निर्णय दिला आहे. कायद्याने दिलेले अधिकार सनदशीर मार्गाने प्रस्थापित करण्याचा त्यांना अधिकार आहे.